महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ अमरावती

**जाहीरात क्र १/२०१७ अंतर्गत सर्वेक्षक श्रेणी -२ (Surveyor Grade -2) पदावर नेमणूक करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची तात्पुरती पुरवणी निवड यादी / प्रतिक्षा यादी.**

महापारेषण कंपनीच्या अमरावती परिमंडल कार्यालयाने प्रसारित केलेल्या जाहीरात क्र १/२०१७ अन्वये सर्वेक्षक श्रेणी -२ (Surveyor Grade -2) या पदासाठी दि. २०.०८.२०१७ रोजी घेण्यात आलेल्या ऑनलाईन लेखी परिक्षेत उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे तसेच जाहीरातीत देण्यात आलेली सर्वेक्षक श्रेणी -२ (Surveyor Grade -2) पदाची उपलब्ध संख्या व सामाजिक आरक्षण वगैरे बाबी विचारात घेऊन तात्पुरते पात्र ठरलेल्या उमेदवारांची सर्वेक्षक श्रेणी -२ (Surveyor Grade -2)या पदाची तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी ही काही अटी व शर्तीच्या अधीन राहून दि. १८.०९.२०१७ व दिनांक १३.१२.२०१७ रोजीच्या सुचनापत्राव्दारे प्रकाशीत करण्यात आलेली होती.

१. त्या अनुषंगाने तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांना प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणी करीता बोलावून त्यांच्या कागदपत्रांची/ प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आली आहे. कागदपत्र पडताळणीस तात्पुरत्या निवड यादीतील काही उमेदवार उपस्थीत न राहील्यामुळे किंवा कागदपत्र पडताळणीत अपात्र ठरल्यामुळे प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणी करीता बोलावून पात्रता सिध्द करण्याची संधी देण्यात आली होती. तथापी, प्रतिक्षा यादीतील उमेदवार सुध्दा कागदपत्र पडताळणीस उपस्थीत न राहील्यामुळे किंवा कागदपत्र पडताळणीत अपात्र ठरल्यामुळे दि. १८.०९.२०१७ व दि. १३.१२.२०१७ रोजीच्या सुचनापत्रातील अट क्र ६/७ नुसार तात्पुरती पुरवणी यादी प्रकाशीत करण्यात येत आहे.

२. तात्पुरती पुरवणी यादीतील निवड ही उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेत मिळालेल्या गुणानुसार तसेच उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये दर्शविलेल्या इतर माहितीच्या आधारे करण्यात आलेली असून उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये दर्शविलेली माहिती मूळ प्रमाणपत्राच्या / कागदपत्रांची पडताळणी वेळी तपासण्यात येईल.

३. तात्पुरती पुरवणी यादीत निवड करण्यात आलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांची शैक्षणीक अर्हता , अनुभव , वय , मागास प्रवर्ग उन्नत प्रगत गटात मोडत नसणे , अधिवास प्रमाणपत्र इ. बाबतचे सर्व मुळ प्रमाणपत्रे , कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील व ती सादर करु न शकल्यास उमेदवारांची निवड रदद करण्यात येईल.

४. केवळ तात्पुरती पुरवणी यादीत नावाचा समावेश आहे म्हणुन नेमणूक मिळण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ही निवडयादी पुर्णत: जाहीराती मध्ये नमुद केलेली शैक्षणीक अर्हता आणी इतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधीन राहून तयार करण्यात आली आहे.

५. सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade -2) या पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करित नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींची किंवा जाहीरातीमधील कोणत्याही अटींचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर रदद करण्यात येईल.

६. उमेदवारांजवळ असलेली पात्रता व सर्व आवश्यक कागदपत्रे ही जाहीरातीस नमुद केलेल्या दिनांका पर्यंत धारण/ प्राप्त केलेले असणे व वैध असणे आवश्यक आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी ज्या उमेदवारांनी आवश्यक पात्रता व कागदपत्रे ही जाहिरातीच्या शेवटच्या दिनांका पर्यंत धारण / प्राप्त केलेली नसतील व वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी रदद करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्र व्यवहाराची दखल महापारेषण कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही.

७. सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade -2) या पदाच्या तात्पुरती पुरवणी निवड यादीतील उमेदवार हे कागदपत्र पडताळणीत अपात्र आढळून आल्यास पुरवणी प्रतिक्षा यादी कार्यान्वीत करण्यात येऊन त्या यादीतील उमेदवारांची पात्रता व कागदपत्रे पडताळणी करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात येईल सदर प्रतिक्षा यादीतील उमेदवार सुध्दा पात्रता व कागदपत्रे पडताळणीत अपात्र ठरल्यास त्या खालील गुणवत्ता धारक उमेदवारांची स्वतंत्र निवड / प्रतिक्षा यादी लावण्याचे अधिकार महापारेषण कंपनी राखून ठेवत आहे.

८. सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade -2) या पदाची पुरवणी निवड / प्रतिक्षा यादी घोषित करतांना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे तथापि अनावधानाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करुन योग्य ती कार्यवाही करण्याचा अधिकार महापारेषण कपंनीने राखून ठेवलेला आहे.

९. सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade -2) या पदाच्या तात्पुरती पुरवणी निवड / प्रतिक्षा यादीत समावेश असलेल्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीच्या पुढील प्रक्रिये संदर्भात परिमंडळ कार्यालयाद्वारे कळविण्यात येईल.

१०. सदर पुरवणी / निवड / प्रतिक्षा यादी ही दि. १८.०९.२०१७ पासुन १ वर्षा करीता वैध राहील.

११. सर्वेक्षक श्रेणी -२ (Surveyor Grade -2)या पदाची तात्पुरती पुरवणी निवड / प्रतिक्षा यादी खालील प्रमाणे

**Select List**

| Sr. No. | Roll No | Name of the candidate | Category | Remarks |
|---|---|---|---|---|
| 01 | 1701090030 | Aslam Babu Faquir | Open | |

**Wait List**

| Sr. No. | Roll No | Name of the candidate | Category | Remarks |
|---|---|---|---|---|
| 01 | 1201090065 | Sunil Shashikant Shinde | Open | |

दि. २०.०४.२०१८

सही /-
मुख्य अभियंता
अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ
अमरावती